| | |
|---|---|
| MHNS230009522014 | **दाखल दिनांक : ०२.०८.२०१४**<br>**नोंदणी दिनांक : ०२.०८.२०१४**<br>**निकाल दिनांक : १९ .०५.२०२६**<br>**कालावधी : ११**व.०९म.१७दि |

**<u>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इगतपुरी, जि. नाशिक येथील न्यायालयात</u>**

**(पिठासन अधिकारीः श्रीमती ए. सी. रोकडे )**

**नियमित फौजदारी खटला क्र. ११४/२०१४** **निशाणी क्र. ४९**

| | |
|---|---|
| **गुन्हा क्र. व गुन्हयांची कलमे** | प्रथम खबर I–११०/२०१४ भा.दं.वि. कलम ३८०, ४५४ व ४५७ प्रमाणे |
| **फिर्यादी** | महाराष्ट्र शासन तर्फे वाडीव–हे पोलीस स्टेशन ता. इगतपुरी, जि.नाशिक |
| **सरकारी अभियोक्ता** | श्री. ए.जी.मनियार |
| **आरोपी** | **१.** राजाराम विष्णू पवार,<br>**वय** – ४० वर्षे, **व्यवसाय**– शेती,<br>**रा.** कु–हेगाव, ता. इगतपुरी, जि. नाशिक.<br>**२.** रमेश एकनाथ गुंजाळ **(मयत)** |
| **आरोपींतर्फे वकील** | श्री. बी.एस. लहाने |
| **गुन्हयाची तारीख** | १६.०१.२०१४ पुर्वी |
| **गुन्हा नोंदणीची तारीख** | १८.०१.२०१४ |
| **दोषारोप पत्र दाखल केल्याची तारीख** | ०२.०८.२०१४ |
| **दोषारोपाची तारीख** | १४.०२.२०२४ |
| **पुरावा सुरु झाल्याची तारीख** | १४.०२.२०२४ |
| **न्यायनिर्णय प्रलंबित ठेवल्याची तारीख** | १९.०५.२०२६ |
| **न्यायनिर्णय घोषित केल्याची तारीख** | १९.०५.२०२६ |

## आरोपींचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | गुन्हयाची कलमे | निर्दोष मुक्त/ शिक्षेस पात्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | राजाराम विष्णू पवार | ०२.०२. २०१४ | ०५.०२. २०१४ | भा.दं.वि क ३८०, ४५४ व ४५७ | **निर्दोष मुक्त** |
| २ | रमेश एकनाथ गुंजाळ | अटक नाही | ०५.०२. २०१४ | वरील प्रमाणे | **उपक्षम** |

## सरकारतर्फे साक्षीदारांची यादी

| साक्षीदार क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र.१ (नि.३६) | संपत सावळीराम माळुंजकर | पंच |
| सा.क्र.२ (नि.३९) | विजय पोपट पवार | फिर्यादी |
| सा.क्र.३ (नि.४२) | भाउसाहेब त्रंबक धोंगडे | साक्षीदार |
| सा.क्र.४ (नि.४३) | जगन भिमा धोंगडे | साक्षीदार |

## न्यायनिर्णय
## (घोषित दि. १९ मे २०२६)

प्रस्तुत खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३८०,४५४ व ४५७ सह ३४ अन्वये चालविण्यात आला.

**प्रस्तुत खटल्याची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे –**

२. दिनांक १६/०१/२०१४ रोजी रात्री ०८.०० वा. च्या सुमारास फिर्यादी त्याचे कु–हेगाव येथील बंद घराकडे गेला असता दरवाजाची बाहेरी कडी व कोयडा तुटलेला होता. दरवाजाला होल पाडून सेंटर लॉक तोडलेले होते. फिर्यादीने आत जाउन पाहिले असता, त्याला घरात ठेवलेले तांदळाचे कट्टे व डब्यात ठेवलेले पैसे दिसले नाही. त्याने गावात जाउन सरपंच भाउसाहेब धोंगडे यांना चोरी झाल्याचे सांगितले असता त्यांनी राजराम विष्णू पवार याने गुंजाळ यांच्या पिकअप गाडीतुन सदर कट्टे कुठेतरी घेउन गेल्याचे कळविले. यावरून फिर्यादीने सदरचे कट्टे व पैसे आरोपींनी चोरी केल्याबाबत

वाडीव–हे पो.स्टे येथे फिर्याद दिली. सदर फिर्यादवरुन गुन्हा नोंदवला. तपासी अधिकारी यांनी प्रस्तुत गुन्हयाचा तपास पुर्ण करुन आरोपी विरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले आहे.

**३.** सदर फिर्यादीवरुन गुन्हा र.क्र.११/२०१४ भा.दं.वि. कलम ३८०, ४५४ व ४५७ सह ३४ प्रमाणे नोंदविण्यात आला. संबंधित तपासी अधिकाऱ्यांनी घटनास्थळ पंचनामा तयार करुन साक्षीदारांचे जबाब नोंदविले व आरोपींविरुध्द सदरचे दोषोरापपत्र दाखल केले.

**४.** दोषारोपपत्र दाखल झालयानंतर आरोपी क्र. २ मयत झाल्याने त्याचे विरूघ्द प्रकरण उपक्षम करण्यात आले. माझे पुर्वाधिकारी यांनी आरोपी क्र.१ विरूध्द नि. क्र.३२ वर भा.दं.वि कलम ३८०, ४५४ व ४५७ सह ३४ प्रमाणे दोषारोप ठेवलेला असुन सदरचा दोषारोप आरोपीला त्याच्या बोलीभाषेतुन वाचुन दाखविला असता त्यांनी गुन्हा अमान्य केला.

**५.** सरकारपक्षाचा पुरावा संपल्यानंतर आरोपीविरुध्द दोषारोपपुर्ण असा पुरावा मिळुन आल्याने फौजदारी प्रक्रिया सं. क. ३१३(१)(ब) नुसार आरोपीचे निवेदन (नि.४७) नोंदविण्यात आले.

**६.** सरकारपक्षाची केस व उभयबाजुंचा युक्तीवाद विचारात घेतल्यानंतर खालील मुद्दे माझे विचाराधीन उपस्थित झाले आहेत. मी त्यांचा निष्कर्ष त्यांच्या समोर खालील दिलेल्या कारणमिमांसेवरुन नोंदविलेला आहे.

| अ.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्ष सिद्ध करतो का की, दिनांक १६/०१/२०१४ रोजी रात्री ०८.०० वा. च्या दरम्यान आरोपीने कु–हेगाव, ता. इगतपुरी येथे फिर्यादीच्या घरात चोरी करण्याच्या उद्देशाने त्याच्या संमतीशिवाय अनाधिकाराने प्रवेश करून भा. दं. वि. क. ४५४ अन्वये गुन्हा केला? | **नाही.** |
| २ | अभियोग पक्ष सिद्ध करतो का की, उपरोक्त नमुद दिवशी व वेळी आरोपीने कु–हेगाव, ता. इगतपुरी येथे फिर्यादीच्या घरात चोरी करण्याच्या उद्देशाने त्याच्या घराचा दरवाजा तोडून अनाधिकाराने प्रवेश करून भा. दं. वि. क. ४५७ अन्वये गुन्हा केला? | **नाही.** |
| ३ | अभियोग पक्ष सिद्ध करतो का की, उपरोक्त नमुद दिवशी व वेळी आरोपीने कु–हेगाव, ता. इगतपुरी येथे फिर्यादीच्या घरात | |

| | | |
|---|---|---|
| | अनाधिकाराने प्रवेश करून याच्या घरातून दहा तांदळाचे कट्टे व रोख रू. ५ हजार चोरी करून भा. दं. वि. क. ३८० अन्वये गुन्हा केला? | **नाही.** |
| ४ | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>कारणमिमांसा</u>

**७.** आरोपींविरूध्द दोषारोप सिध्द करण्याचे अभियोग पक्षाने फिर्यादी सा.क्र. २ विजय पवार यास नि.३९, सा.क्र.३ भाउसाहेब धोंगडे यांस नि.४२, सा.क्र.४ जगन धोंगडे यास नि.४३ व पंच सा.क्र. १ संपत मांळूजकर यांना नि.३६ वर तपासले आहे.

**<u>मुददे क्र.१ ते ४ करीता</u>:**

८. दि. १६.०१.२०१४ रोजी रात्री ८.०० चे सुमारास फिर्यादीला आरोपींनी त्याचे कु–हेगाव, ता. इगतपुरी येथील घराचा दरवाजा तोडून घरातून तांदळाचे १० कट्टे व रोख रू. ५ हजार चोरी केल्याचे समजले अशी सरकार पक्षाची हकीकत आहे.

९. फिर्यादी सा.क्र. २ विजय पवार याने त्याच्या साक्षीपुराव्यात दि. १६.०१.२०१४ रोजी रात्री ८ च्या दरम्यान तो कु–हेगाव येथे त्याचे घरी गेला होता. तेथे त्याला घराच्या दरवाजाचा कडी कोयंडा तुटलेला दिसला. त्या दरवाजाच्या प्लायला होल पाडलेले होते व सेंट्ल लॉक तोडलेले होते. घराचा दरवाजा अर्धा उघडा होता. त्याने आत जाउन पाहिले असता त्याला तांदळाचे कट्टे व डब्यात ठेवलेले रू. ५ हजार मिळून आले नाही. याबाबत त्याने त्यांचा पुतण्या संतोष यांचेकडे विचारणा केली असता त्याने त्याबाबत काही सांगितले नाही. त्यानंतर तो सरपंच भाउसाहेब धोंगडे यांचेकडे गेला असता त्यांनी मंदीराचे कमान घेउन एक पिकअप गावात आली व राजाराम पवार हा कट्टे टाकून घेवून गेलयाचे सांगितले. याबाबत फिर्यादीने पिकअप वाल्याकडे फोन करून चौकशी केली असता त्याने कट्टे घेवून नाशिकला गेले असल्याचे सांगितले. यावरून फिर्यादीने आरोपीविरूध्द नि.४० वरील फिर्याद दाखल केली. उलटतपासादरम्यान सदर साक्षीदाराने घटना प्रत्यक्ष पाहिले नसल्याचे मान्य केले आहे. तसेच सदर घटना कधी घडली हे त्याला सांगता येणार नसल्याने त्याने मान्य केले आहे. सदर साक्षीदाराने आरोपी हा त्याचा चुलत भाउ असून आरोपीने त्याचेविरूध्द जमिनीच्या कारणावरून पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केल्याचे मान्य केले आहे.

**१०.** अभियोगपक्षातर्फे पंच सा. क्र. १ नामे संपत मांळूजकर, सा.क्र.३ भाउसाहेब धोंगडे व सा.क्र. ४ जगन धोंगडे यांची साक्ष नोंदवण्यात आली. सदर साक्षीदारांनी त्यांच्या साक्ष जबाबात अभियोग पक्षास सहाय्यभुत ठरेल अशी कोणतीही बाब सांगितली नाही. त्यामुळे त्यांची साक्ष सदर प्रकरणात ग्राहय धरता येणार नाही. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांचा पुरावा गुन्हा सिध्द करण्यास उपयुक्त नाही. अभियोग पक्षाने आरोपीविरूध्द केलेल्या आरोपाबाबत प्रत्यक्ष किंवा कोणताही सबळ परिस्थितीजण्य पुरावा सादर केला नाही. तसेच वांरवार संधी देवून तपासी अंमलदाराची साक्ष नोंदविण्यात आली नाही. आरोपीविरुद्ध सदर प्रकरणात दाखल झालेला गुन्हा भा. द. सं. कलम ३८०,४५४ व ४५७ अन्वये असुन त्यामध्ये आरोपी इसमाने फिर्यादीच्या घरातून अनाधिकाराने प्रवेश करून मुद्देमाल त्याच्या संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने चोरुन नेल्याचे सिद्ध होणे आवश्यक आहे. सदर प्रकरणात कोणत्याही प्रत्यक्षदर्शी अथवा स्वतंत्र् साक्षीदाराची साक्ष नोंदवण्यात न आल्यामुळे आरोपीविरूध्द गुन्हा सिद्ध होउ शकलेला नाही. त्यामुळे आरोपीविरुद्धचे कलम ३८०,४५४ व ४५७ अन्वये मुलभूत घटक सिद्ध होउ शकले नाहीत. परिणामी आरोपीची सदर गुन्हयातून निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित ठरेल. सबब, मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित असून मुद्दा क्र. ४ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे :

## आदेश

१) आरोपी राजाराम विष्णू पवार याची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता कलम ३८०,४५४ व ४५७ अन्वये शिक्षापात्र असलेल्या आरोपांतून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जामीन बंधपत्र कायम करण्यात येते.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

APARNA CHANDRAKANT ROKADE

Digitally signed by APARNA CHANDRAKANT ROKADE
Date: 2026.05.19 12:16:19 +0530

**दिनांकः–** १९.०५.२०२६

(ए. सी. रोकडे )

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इगतपुरी. जि. नाशिक**